# कार्यकारी दंडाधिकारी राजापूर यांचे कार्यालय,

**मेन रोड ता. राजापूर जि. रत्नागिरी पिनकोड:-416 702 दुरध्वनी फोन:-02353 – 222027**

Email- tah_rajapur@rediffmail.com


क्रमांक/फौजदारी/सीआरपीसी 144/मनाई आदेश/2023 दिनांक 22/04/2023

**वाचले :** 1. फौजदारी प्रक्रीया संहिता, 1973 चे कलम 144(2).

2. पोलीस निरीक्षक, राजापूर यांचेकडील पत्र क्रमांक 3320/2023 दिनांक 22/04/2023.

3. मा. जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र. उचिशा/पोल-2/कावि-888/2023 दिनांक 21/04/2023.

4. मा. उपविभागीय अधिकारी राजापूर यांचेकडील पत्र दिनांक 22/04/2023.

---

## फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144(1, 2 व 3) प्रमाणे मनाई आदेश

**आदेश :**

ज्याअर्थी, भारत सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम 1) इंडीयन ऑईल कॉर्पोरेशन लि. 2) भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. व 3) हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांच्या संयुक्त विदयमाने रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात क्रूड ऑईल रिफायनिंग करणारी "रत्नागिरी रिफायनरी व पेट्रोकेमिकल उदयोग" प्रस्तावित आहे. महाराष्ट्र शासनाचा उपक्रम म्हणून महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाव्दारे सदर प्रकल्प राजापूर तालुक्यातील बारसू, गोवळ, धोपेश्वर तसेच नाटे या परिसरात नियोजित आहे. मागील वर्षापासून "रत्नागिरी रिफायनरी व पेट्रोकेमिकल उदयोग" विरोधक या प्रकल्पाचे काही स्थानिक ग्रामस्थ सक्रिय झाले असून रिफायनरी विरोधी संघटना राजापूर तसेच मुंबई येथे स्थापन झालेल्या असून त्या माध्यमातून ते विरोध दर्शवित आहेत. याबाबत रिफायनरी विरोधकांनी राजापूर शहरात मोर्चा, मेळावे, मुंबई येथील आझाद मैदान येथे धरणे, हिंसक आंदोलन अशा स्वरुपाची आंदोलने केली आहेत. तसेच वर नमुद गावांव्यतिरिक्त अन्य भागातुनही आंदोलक अशा आंदोलनात सहभागी होत असतात.

बारसु परिसरात औदयोगिक क्षेत्र स्थापन करण्याकरीता जमिन योग्य आहे किंवा कसे? याकरीता महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाकडून प्राथमिक सुसाध्यता तपासणी करणेकरीता ड्रोन सर्व्हेक्षण व भू सर्व्हेक्षणाचे काम चालू करण्यात आले होते. त्यावेळच्या कालावधीत "रत्नागिरी रिफायनरी व पेट्रोकेमिकल उदयोग" प्रकल्प विरोधी भुमिका घेऊन लोकांचे नेतृत्व करणे, दंगल करणे, गैर परिरोध करणे, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान करणे, फौजदारी पात्र धाकदपटशा करणे, चिथावणी देणे, समान उद्देशासाठी बेकायदेशीर जमाव जमवून त्यात सामिल होणे, इच्छा पुर्वक दुखापत पोहोचविणे, नुकसान पोहोचवण्याच्या उद्देशाने आवेग करणे, लोकसेवकाला कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने परावृत्त करणे, जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी यांनी केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणे असे गुन्हे घडलेले आहेत.

राजापूर तालुक्यात प्रस्तावित ठिकाणी माती परिक्षणासाठी ड्रिलिंगचे कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

वरील परिस्थिती पाहता माती परिक्षणाच्या वेळी मोठया प्रमाणात प्रकल्प विरोधक व्यक्ती, ग्रामस्थ व त्यांचे सहकारी ड्रिलिंगचे काम करणाऱ्या लोकांना त्यांचे कामात व्यत्यय आणण्याची, बंदोबस्तासाठी नेमलेल्या पोलीसांच्या कर्तव्यात अडथळा करण्याची किंवा विरोध करण्याची, येथे जाण्या-येणाऱ्या मार्गात

अडथळा करण्याची, तेथील व्यक्तीच्या जिवितास धोका पोहोचविण्याची, तेथील सार्वजनिक शांततेस बाधा पोहोचविण्याची, तसेच समाज माध्यमांवर मेसेज, चित्र, व्हिडीओ प्रकाशित करुन स्थानिक ग्रामस्थांना जनप्रक्षोभ चिथावणी देण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यास अनुसरुन दिनांक 22/04/2023 रोजी पासून ते दिनांक 31/05/2023 या कालावधी पर्यत **राजापूर तालुक्यातील बारसू सडा बारसू, पन्हळे तर्फे राजापूर, धोपेश्वर, गोवळ, वरचीवाडी गोवळ, खालचीवाडी गोवळ** येथे ड्रिलींग चालू असणाऱ्या ठिकाणच्या 1 कि.मी. व्यासाच्या परिघामध्ये प्रशासकीय व पोलीस यंत्रणा यांची परवानगी असल्याशिवाय प्रवेश व संचार करण्यास कलम 144 (1,2,3) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये मनाई आदेश निर्गमित करणेबाबत पोलीस निरीक्षक, राजापूर यांनी संदर्भ क्र. 2 अन्वये या कार्यालयाकडे विनंती केली आहे.

त्याअर्थी, राजापूर तालुक्यातील प्रस्तावित "रत्नागिरी रिफायनरी व पेट्रोकेमिकल उदयोग" प्रकल्पाच्या अनुषंगाने माती परिक्षणासाठी ड्रिलिंगचे कामास सुरुवात करण्यात येणार असून सदर कामात अडथळा आणून कायदा व सुव्यवस्थेची,परिस्थितीला बाधा निर्माण करण्याची दाट शक्यता असल्याने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने अशा प्रवृत्तींना अटकाव करणे आवश्यक आहे, असे पोलीस निरीक्षक, राजापूर यांच्या संदर्भ क्र. 2 च्या अहवालाचे अवलोकन करता मी निष्कर्षाप्रत आले आहे.

त्याअर्थी, मी **शीतल जाधव, तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, राजापूर** फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (2) अन्वये प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन सदयस्थितीचा, अल्प कालावधीचा विचार करता नोटीस निर्गमित करणे, खुलासा करणे, सुनावणी घेणे असा अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने दिनांक 22/04/2023 रोजी पासून ते दिनांक 31/05/2023 या कालावधी पर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (3) अन्वये **राजापूर तालुक्यातील बारसू सडा बारसू, पन्हळे तर्फे राजापूर, धोपेश्वर, गोवळ, वरचीवाडी गोवळ, खालचीवाडी गोवळ** येथे ड्रिलींग चालू असणाऱ्या ठिकाणच्या 1 कि.मी. व्यासाच्या परिघामध्ये प्रशासकीय व पोलीस यंत्रणा यांची परवानगी असल्याशिवाय प्रवेश व संचार करण्यास, समाज माध्यमांवर कोणत्याही प्रकारचे चिथावणीखोर व सर्व सामान्यांच्या मनात संभ्रम निर्माण करणारे पोस्ट, चित्र, व्हिडीओ प्रदर्शित करण्यास फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 कलम 144 (2 व 3) अन्वये मनाई करण्यात येत आहे.

सदर हुकुमाचा भंग करणा-या व्यक्ती भारतीय दंडसंहिता 1860 चे कलम 188 नुसार कारवाईस पात्र राहतील.

सदरचा आदेश माझी सही व शिक्क्यानिशी आज दिनांक 22/04/2023 रोजी दिला आहे.

कार्यकारी दंडाधिकारी राजापूर

Jadhav
**(शीतल जाधव)**
**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी राजापूर**

प्रतिलिपी -

1) मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
2) मा. उपविभागीय अधिकारी राजापूर यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
3) पोलीस निरीक्षक, राजापूर यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी.
4) सर्व संबधिताना

मपो03
(के. आर. तचेकर)
**पोलीस ठाणे अंमलदार**
**राजापूर पोलीस ठाणे**
दि. 23/04/2023 रोजी 09-15 वा.

Jadhav
**(शीतल जाधव)**
**तहसीलदार तथा**